**जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद**

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

**वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.**

**2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.**

---

**क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26**

**दिनांकः- 17/03/2020.**

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 1 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने “महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020” प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व धुम्रपान करणे यामुळे करोना विषाणू (COVID-19) चा प्रसार व प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे असे पदार्थ विक्री करणारी दुकाने व पानटप-या बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये तंबाखु व तंबाखुजन्य धुम्रपानाचे पदार्थ इ. ची विक्री करणारी सर्व दुकाने/पानटप-या इ. पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात यावीत असे आदेशित करीत आहे.**

या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती/अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प., उस्मानाबाद, पोलीस उपअधीक्षक (गृह), सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद, जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र. जि. का. उस्मानाबाद, सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती व मुख्याधिकारी नगर परिषद जिल्हा उस्मानाबाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील “महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020” चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

-sd-

**(दिपा मुधोळ-मुंडे)**

**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**



Scanned by CamScanner

**प्रत:-** 1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना माहितीस्तव.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
6. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
7. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
9. पोलीस उपअधीक्षक (गृह), पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.
10. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
11. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
13. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
14. सर्व शासकीय कार्यालये जिल्हा उस्मानाबाद.

17/3/20

**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner